राष्ट्रीय आरोग्य अभियान,
जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी,
आरोग्य विभाग, जि.प.सोलापुर.

==========================================

दिनांक २७/०७/२०२२

# १५ वित्त आयोग पदभरती एम.पी.डब्लू-पुरुष पदांचे शुध्दिपत्रक

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत १५ वित्त आयोग अंतर्गत पदभरती प्रक्रिया राबविणेकामी दिनांक १०/०५/२०२२ रोजी जाहिरात व अर्जाचा नमुना जिल्हा परिषद सोलापुर संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले होते.

**पद क्रमांक ०३ एम.पी.डब्लू-पुरुष या पदांच्या शैक्षणिक अर्हतेमध्ये मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्याकडील दिनांक ०५/०७/२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये बदल करण्यात आलेला आहे. त्यानुसार शैक्षणिक अर्हतेमध्ये सुधारीतपणे झालेला बदल खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.**

| प्रसिध्द केलेली शैक्षणिक अर्हता | सुधारित शैक्षणिक अर्हता |
|---|---|
| **B.Sc / M.Sc<br>OR<br>Sanitary Inspector Course.** | अ) **B.Sc / M.Sc OR Sanitary Inspector Course**<br>ब) आरोग्य विभागाच्या आरोग्य आणि कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र किंवा सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपुर यांच्याकडून आरोग्य कर्मचारी पदासाठी निश्चित केलेला निमवैदयकिय मुलभूत प्रशिक्षण अभ्यासक्रम. |

तरी सदरील शुध्दीपत्रकान्वये उमेदवारांना सुचित करण्यात येते की, सुधारित शैक्षणिक अर्हतेनुसार फक्त ब मधील नमुद केलेली शैक्षणिक अर्हता परिपुर्ण करत असलेल्या उमेदवारांचे अर्ज नव्याने स्विकारण्यात येत असुन, सदरील अर्ज स्विकृती ही दि.२८/०७/२०२२ ते दि.२९/०७/२०२२ या कार्यालयीन ०२ दिवसाकरीता वाढविण्यात येत असुन, अर्ज स्विकृती ही जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक कक्ष, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय तळमजला, सिव्हील हॉस्पीटल आवार, सोलापुर या ठिकाणी स्विकारण्यात येत आहेत. अर्ज सादर करणेकामी दिनांक १०/०५/२०२० रोजी प्रसिध्द केलेल्या १५ वित्त आयोग पदभरती जाहिरातीतील अर्ज नमुना, नियम, अटी व शर्तीनुसार पात्र ठरत असलेल्या उमेदवारांनी अर्ज सादर करावेत.

(स्वाक्षरीत /--)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, सोलापुर

(स्वाक्षरीत/--)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, सोलापुर